# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Security for Libraries in the E - Environment | Dr. Vilas Ubhale | 01 |
| 2. | भाषा शिक्षण | डॉ. सुनीता पुरुषोत्तम सांगोले | 06 |
| 3. | बंजारा लोकांचे जीवन आणि भाषा | डॉ. लक्ष्मण पवार | 11 |
| 4. | मराठी साहित्याच्या वाटचालीत 'साहित्य - समन्वय' चे योगदान | प्रा. डॉ. चंद्रकांत वाघमारे<br>विष्णू शिवाजी कांबळे | 15 |
| 5. | भाषेचे स्वरूप : एक अवलोकन | प्रा. डॉ. धस एस. एस. | 17 |
| 6. | राजर्षी शाहू महाराज व्यक्ती आणि कार्य : एक सिंहावलोकन | प्रा. डॉ. राजेंद्र ओं. बेलोकर | 19 |
| 7. | कृषी क्षेत्राच्या ऱ्हासाचा राष्ट्रीय उत्पन्नावर होणाऱ्या विपरीत परिणामाचा चिकित्सक अभ्यास | प्रा. डॉ. मुंडे एस. इ. | 22 |
| 8. | नक्षल चळवळीचे यश व अपयश | प्रा. व्ही. बी. चांदजकर | 25 |
| 9. | डिजिटल ग्रंथालयांच्या तुलनात्मक अध्ययनाची उपयुक्तता | श्री. राकुमार गं. बोंडे | 31 |
| 10. | जागतिकीकरणाचा भारतीय आदिवासी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर परिणाम | डॉ. ए. टी. तवार<br>ए. डी. मडावी | 34 |
| 11. | उमरगा तालुक्यातील बाजरी पिकाच्या उत्पन्नामध्ये झालेला बदल : एक भौगोलिक अभ्यास | प्रा. डॉ. राठोड सूर्यकांत लालचंद | 40 |
| 12. | उच्च शिक्षणात शारीरिक शिक्षण शिक्षकांची भूमिका | पांडुरंग जगन्नाथ गोटे | 43 |
| 13. | रामानुजनांची धर्म आणि ईश्वर संकल्पना | नागरगोजे दिलीप | 46 |


Assit. Professor
N.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

ISSN : 2278-8204

INTERNATIONAL MONTHLY RESEARCH JOURNAL FOR ALL SUBJECT

# AKSHARDEEP

Year - V
September
2016

Assit. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

Editor
Dr. Ganesh Lahane

ISSN 2278-8204
Vol.V Issue : III,
September, 2016

पुर्वी बंजारा समाज भटक्या अवस्थेत होता. या कळात त्यांना अनेक संकटांना, संघर्षाना सामोरे जावे लागले. याच काळात त्यांनी आपली भाषा विकसित केली. ती इतरांना न कळणारी रुक्मिणी पवार म्हणतात 'देशाला स्वातंत्र मिळवून देण्यासाठी क्रांतीकारकांनीही गुप्त भाषेचा वापर केला आहे.' बंजारात पंचायत भरलेली असेल त्यावेळी पाच पंच सांकेतीक, गुप्त भाषेचा वापर करतात. त्यामुळे सगळ्यात एकात्मतेची भावना जागी होते. भाषेच्या संदर्भात विचार करता असे सांगता येईल की, आपल्या विचाराचे रहस्य इतरांना कळू नये, यासाठी गुप्त शब्दाचा वापर करतात. ज्यावेळी बंजारा समाजाजवळ जगण्याची साधने नव्हती अशा वेळी बंजारा चोरी, वाटमारी, दरोडा असे गुन्हे करत असे. या प्रसंगी त्यांनी गुप्त भाषा निर्माण केली उदा. जांग्यावाळो आयोचं-पोलीस आला, सासरेमं-जायेर छ-जेलमध्ये जायचे आहे का? काळोपाणी-दारु, गदळोपाणी-चाय, नुंळ-मिठ, कोर-गावातील व्यक्ती, कोरी-स्त्री, डोकरा-म्हातारा, याडी-आई इत्यादी गुप्त भाषीक शब्दांचा वापर बंजारांनी वेळप्रसंगी केलेला आहे. त्यामुळे भाषेची वैभवता आजही टिकून आहे व दोन बंजारा एकत्र आले ते कीतीही उच्च पदावर राहो ते बंजारा भाषेतूनच संवाद साधतात. अशा वेळी ते काय? बोलतात ते इतरांना कळत नाही. म्हणून बंजारा भाषा ही दोन व्यक्तींना जोडणारी भाषा आहे. असे स्पष्ट होते.

एकंदरीत बंजारा भाषा आणि लोकजीवन यांचा विचार केला तर असे स्पष्ट होते की, बंजारांनी आपले दैनंदिन व्यवहार करून, लोकसंस्कृती टिकविण्यासाठी स्वतंत्र बंजारा भाषेची निर्मिती केलेली आहे. या समाजाला हिंदूधर्माने प्रवाहात समाविष्ट न करता गुन्हेगारी जमात म्हणून प्रवाहाबाहेर फेकून दिले. परिणामी त्यांनी आपली स्वतंत्र सांकेतिक भाषा निर्माण केलेली आहे. याचा फायदा त्यांना त्यांच्या जीवनशैलीत झाला. त्यांच्यातील संभाषण केवळ त्यांना कळत असल्यामुळे त्यांना सुरक्षा मिळाली. म्हणूनच अनेक भाषेचे आक्रमण होऊनही बंजारा भाषेवर काहीच परिणाम झालेला दिसत नाही. अशा भाषेचा अभिमान बंजारा लोकांना असल्यामुळे तें जेंव्हा जेंव्हा दोन व्यक्ती एकत्र येतात तेंव्हा फक्त आणि फक्त बंजारा भाषेतच बोलतात तेंव्हा इतर भाषेचा शुन्य टक्के विचार संवाद साधतात. म्हणून असे सांगता येईल की, बंजारा समाज आणि बंजारा भाषा यांना वेगळे करणे म्हणजे जन्मलेल्या बाळाला आईपासून दूर करणे आहे. ऐवढे सामर्थ्य बंजारांच्या बोलीभाषेत आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) डॉ. लक्ष्मण पवार, बंजारा : समाज, संस्कृती आणि स्त्री.
२) डॉ. यशवंत जाधव, बंजारा जनजाति का इतिहास.
३) बळीराम पाटील, बंजारा लोकांचा इतिहास.
४) डॉ. गणपत राठोड, बंजारा लोकगीतों का सांस्कृतिक अध्ययन.
५) प्रा. मोतीराम राठोड, गुन्हेगारी एक्स जमाती.

Assit. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.V. Issue : III,
September, 2016

**इतर लोकांकडून शोषण :** इंग्रजांच्या आगमनाने, बंजारा समाजाचा पारंपारिक व्यापार व्यवसाय बंद पडला. त्यामुळे ते आपल्या आणि आपल्या गायी-बैलांच्या उपजिविकेसाठी रानोमाळ भटकू लागले. जनावराच्या सोईसाठी ज्या ठिकाणी पाणी असेल, चारा असेल त्या ठिकाणी ते राहू लागले. त्याबरोबरच शेतीही करु लागले. ज्या ठिकाणी थांबायचे त्या ठिकाणी अधिक दिवस न थांबता जनावरांचा चारा-पाणी संपला की, दुसरे ठिकाण शोधायचे असे दिनचक्र त्यांचे चालू झाले. जंगलाच्या सानिध्यात राहणं, शेती करणे, फावल्या वेळेत शिकार करणे व स्वाभिमानाने जीवन जगणे.

तांड्याच्या लोकांच्या सुखदुःखात धावून जाणे. वेळप्रसंगी मदत करणे. परंतु इतर समाजाच्या लोकांच्या भानगडीत न पडणे हा त्यांचा मुळ स्वभाव आहे. परंतु संस्कृती संक्रमणामुळे ते शहरांच्या जवळ आले त्यांच्यात बदल झाला. त्यांनाही प्रस्थापित लोकांसारखे जीवन जगावे वाटू लागले. या प्रेरणेने तो अहोरात्र काबाडकष्ट करु लागला. मग ते काम शेतीचे असो की, शैक्षणिक कामाचे असो कष्ट करणे हे त्यांच्या रक्तातच मुरलेले. परंतु प्रस्थापित लोकांना त्यांचे कष्ट करणे, त्यांच्याकडे पैसा येणे, त्यांच्यासारखं राहणे खपत नाही. त्यामुळे विमुक्त लोकांचा विकास त्यांच्या डोळ्यात दुखायला लागतो. याचा परिणाम त्यांच्या काम करण्याच्या जागेवर होतो. त्यांना त्या ठिकाणी अपमानीत केले जाते. जातीवर शिवीगाळ केली जाते. माल विकायला गेल्यावर व्यापारी गांव विचारतात, आडनांव विचारतात त्यानंतर भाव ठरविला जातो. शैक्षणिक क्षेत्रातही यापेक्षा वेगळे नाही. त्या ठिकाणीही प्रस्थापितांची मर्जी सांभाळतच दिवस काढावे लागत. म्हणून जोपर्यंत इतर लोकांची प्रवृत्ती व दृष्टी बदलत नाही तोपर्यंत भटक्या विमुक्तांचे शोषण चालूच राहील.

**अज्ञान व अंधश्रद्धा :** बंजारा समाजात अज्ञान व अंधश्रद्धेचे प्रमाण इतर समाजापेक्षा अधिक आहे. तो जंगलाच्या सानिध्यात राहत असल्यामुळे देवी-देवतांवर भुता-खेतावर, तंत्र-मंत्रावर त्यांचा अधिक विश्वास आहे. स्वातंत्र्यानंतरही तांड्यात शिक्षणाचं वार नाही. असे सांगता येईल शिकून काय करता काम करा म्हणजे खायला मिळेल अशी त्यांची श्रद्धा आहे. त्यामुळे अज्ञानातून अंधश्रद्धेचे पिक जोरात फोफावत चालले आहे. म्हणून सरकारने शिक्षण हे सक्तीचे करावे. त्यामुळे अंधश्रद्धेचे प्रमाण कमी होईल.

जंगलाच्या संपर्कात राहत असल्यामुळे ते पिंपळ, चिंच, जांभूळ या झाडावर भूत राहतात असे सांगतात. मध्यरात्री व दिवसा बारा वाजता या झाडाजवळ जावू नये असे त्यांना वाटते. देवी-देवतांवर श्रद्धा असल्यामुळे मरण पावलेला व्यक्ती भूत होते अशी त्यांची श्रद्धा आहे. म्हणून जर एखाद्या वेळेस बाळंतीण स्त्री मरण पावली असेल तर तीला शेतात न जाळता दूर जंगलात नेऊन जाळतात. ती आपल्या पतीला त्रास देते. घराच्या आजूबाजूला फिरत राहते. असा विश्वास असल्यामुळे मांत्रीक घराच्या बाजूबाजूला गोमूत्र टाकतात, मांत्रिकाने दिलेले भस्म टाकतात. या वैज्ञानिक सुत्रात अंधश्रद्धेमुळे कित्येकांनी आपल्या घरातील आजारी असलेल्या लोकांना दवाखान्यात न नेता मरीआईच्या मंदिरात नेऊन उपचार करतात. त्यामुळे त्यांना जीवाला मुकावे लागते.

लग्न झालेल्या मुली अपत्य प्राप्तीसाठी नवस करतात. दंडाला धागे-दोरे बांधतात, मुक्या प्राण्याचा बळी देतात. त्यातून पैशाचा अपव्यय होतो. ते त्यांना कळतच नाही. म्हणून असे सांगता येईल की, बंजारा समाजात कोणताही उत्सव, विधी हा अज्ञानातून, अंधविश्वासातूनच झालेला आहे. जोपर्यंत त्यांना शिक्षणाच्या, संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात आणल्याशिवाय त्यांचा विकास होणे अशक्यच आहे.

**बंजारा भाषेची वैभवता :** कोणत्याही समाजाच्या किंवा समुहाच्या भाषेचा अभ्यास करताना स्वाभाविकपणे प्रश्न निर्माण होतो की, भाषेची उत्पती कशी झाली असावी. भाषा उत्पत्तीच्या संदर्भात वेगवेगळे मतप्रवाह दिसून येतात. काहींच्या मते आत्मनिवेदनातून भाषेची उत्पत्ती झाली तर काहींच्या मते अनुकरणातून भाषेची निर्मिती झाली आहे. काही समाजानी जाणीवपूर्वक आत्मरक्षण करण्यासाठी जाणीवपूर्वक भाषेची निर्मिती केली. त्या भाषेलाच आज बोलीभाषा म्हणू लागले आहेत. या बोलीभाषेला गुप्तभाषा म्हटले जाते.

Assit. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

Research Paper
In
Marathi

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep

12
ISSN 2278-8204
Vol.V. Issue : III,
September, 2016

आहे. वाटले होते स्वतंत्र भारतात सुराज्य येईल सर्वांना मोकळा श्वास घेता येईल परंतु तसे झाले नाही. वर्णव्यवस्थेच्या नावाखाली प्रस्थापित लोक आम्ही श्रेष्ठ आहोत त्यामुळे आमचेच सर्वांना ऐकावे अशी भूमिका आजही कायम आहे असा न्युनगंड आज या वर्णव्यवस्थेमुळेच झालेला आहे. त्यामुळे स्वतंत्र भारतातील विमुक्त लोकांना खरे जीवन जगता येत नाही. 'जसा देश तसा वेश' 'जशी माणसे तसे वर्तन' असे समजून जीवन जगावे लागते. जे काम मिळेल ते काम करावे लागते, एखादी मुजोर माणसे भेटली तर त्यांची मर्जी सांभाळत झुकावे लागते. त्यामुळे त्यांच्या जीवनातील मानवी मुल्ये नष्ट झालेली आहेत का? याची शंका वाटते.

अंधश्रद्धाळू, विश्वासू म्हणून बंजारा समाजाची ओळख प्राचीन काळापासूनच आहे. त्यामुळे ते इतरांवर चटकन विश्वास ठेवतात. त्यांच्या मर्जीप्रमाणे वागतात. एखादी चुक झाली तर, ते ती चुक प्रांजळ मताने मान्य करतात. पायाही पडतात. येवढं करूनही समोरचा व्यक्ती मोठ्या मनाने माफी करत नसेल तर, त्या व्यक्तीचे पायही उचलतात. ज्या व्यक्तीवर तो प्रेम करतो त्याच्यासाठी जीव देतो व जीवही घेतो. अशी विश्वासू जमात फक्त बंजाराच आहे असे म्हणतांना मला तीळभरही शंका नाही म्हणूनच तर मोगल, निजाम काळात सरकारी दरबारी विश्वासू जमात म्हणून बंजाराची ओळख आहे. अशा विश्वासू जमातीला मात्र वर्णव्यवस्थेने दूर लोटले कोणत्याच वर्णामध्ये त्यांना स्थान मिळाले नाही. परिणामी त्यांना गावाच्या बाहेर जंगलात जावे लागले आणि आपली उपजिवीका करावी लागली आहे.

हा समाज कष्टाळू असल्यामुळे स्त्री आणि पुरुष दोघेही मिळून जिवाची पर्वा न करता आपल्या कुटुंबासाठी आहोरात्र राबतात. वेळप्रसंगी जर पुरुष बाहेरगावी गेलेला असेल तर त्यांची स्त्री शेतात एकटी काम करते. स्त्री जागलही करते. पुरुषांना मदत करतांना मात्र इतर समाजातील लोक काय म्हणतील याचा ती विचार करीत नाही. निसंकोचपणे वखर, नांगर, डवरं हाकलणेची काम करीत असते. म्हणून बंजारा संस्कृतीमध्ये स्त्रीची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. तीच्यामुळेच घराला घरपण येते. घराचे काम करून वेळेच्या आत शेतात जाणारी केवळ बंजारा स्त्रीचं असेल असे मला वाटते. यावरून असे वाटते की, भारतीय संस्कृतीच्या पुरुषप्रधान व्यवस्थेत जे सर्व दुःख स्त्रीच्या वाट्याला आले त्यापेक्षा अधिक दुःख बंजारा स्त्रीच्या वाट्याला आले आहे. एकीकडे तीला घरी सांभाळाने व दुसरीकडे तीला सकाळी उठल्यापासून ते रात्री सर्व झोपेपर्यंत काबडकष्ट अविरतपणे करावे लागते. अशा दुहेरी चक्रात ती सापडलेली आहे.

**संस्कृती दर्शन :** बंजारा समाज हिंदूधर्माचा एक घटक आहे. तो स्वतः हिंदू असूनही हिंदूधर्माच्या संस्कृतीने, वर्णव्यवस्थेने दुर लोटले. हिंदू धर्म तेहतीस कोटी देवी-देवतांना पूजणारा धर्म आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत हिंदू देवता श्रीरामाचे नाव घेतल्याशिवाय दिवस जात नाही. हिंदूधर्म गोमातेचे पूजन करणारा धर्म आहे. त्याप्रमाणे बंजारा समाज गायीला माय, बैलाला बाप मानणारा समाज असून त्यावर अपार श्रद्धा ठेवणारा आहे. कारण बंजारा समाजात गायी-बैलाची संख्या इतर समाजापेक्षा अधिक आहे. ही संस्कृती टिकविण्यासाठी तो वृद्ध गायी-बैलाला विकत नाही. गायी, बैल वारले तर, हिंदूधर्माच्या विधीनुसार त्यांना गाडले जाते.

सकाळी उठल्यावर जो व्यक्ती दिसेल त्या व्यक्तीला ते रामराम करतात. जो व्यक्ती रामराम करीत नाही तो व्यक्ती चांगला माणूस नाही असे समजतात. हिंदूधर्माच्या संस्कृतीनुसार ते बाराही सण साजरे करतात. या सण-उत्सवाला बाहेरगावी सासरी गेलेल्या सर्व मुली माहेरी आणून सन्मान करतात. त्या निमित्ताने उत्सव साजरा होतो व संस्कृतीचे जतन होते. नागपंचमीचा शिराळ उत्सव, दिवाळीचा मेरा-मांगेर, होळीचा लेंगी उत्सव असो या उत्सवा प्रसंगी स्त्री-पुरुष मुक्तपणे गीते गातात. पूजा करतात. या प्रसंगी स्त्रीला आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे पूर्ण स्वातंत्र असते. म्हणून बंजारा समाजाच्या सण-उत्सवाप्रसंगीच संस्कृतीचे संपूर्ण दर्शन झाल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच हजारो वर्षानंतरही बंजारा संस्कृती सण-उत्सवाला जीवंत होते व तांडा नाचु, गाऊ लागते. सर्व एकत्र येऊन उत्सव साजरे करतात.

Asstt. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

Research Paper
In
Marathi

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep

11

ISSN 2278-8204
Vol V. Issue : III,
September, 2016

# बंजारा लोकांचे जीवन आणि भाषा

डॉ. लक्ष्मण पवार
मराठी विभाग
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर

भारत देश हा विविधतेने नटलेला विशाल असा समृद्ध देश आहे. या देशात अनेक धर्माचे, बोलीभाषेचे लोक राहतात. सण-उत्सव प्रसंगी एकत्र येऊन उत्साहाने एकमेकाच्या उत्साहात सहभागी होतात आणि संस्कृतीचे जतन व संवर्धन करतात. या देशात अठरापगड जाती आहेत. त्या एकत्र राहूनही स्वतःची भाषा, संस्कृती टिकवून ठेवतात. सण-उत्सव प्रसंगी त्यांचे वेगळेपण चटकन लक्षात येते. त्यामुळे ते या जातीचे आहे असे ठामपणे आपल्याला सांगता येते.

अठरापगड जातीपैकीच मुख्य संस्कृतीच्या प्रवाहाबाहेर फेकली गेलेली जात म्हणून बंजाराकडे पाहिले जाते. मोगल, निजाम सरकारच्या काळात सैन्याला रसद पुरवठा करणारी वेळ प्रसंगी युद्ध करून मोगलांना मदत करणारी विश्वासू जात म्हणून त्याची ओळख आहे.

बंजारा लोककथेनुसार बंजारा समाज हा मुळचा राजस्थानचा आहे. अनेक बंजारा संशोधक लेखकांनी बंजारा समाज हा रजपूत क्षत्रिय आहे. हे सिद्ध केले आहे. कथेनुसार चित्तोडगडाचा राजा महाराणा प्रतापसिंह यांच्यावर जेंव्हा आक्रमण झाले तेंव्हा त्यांना हार पत्करावी लागली. तेंव्हापासून ते मी गादीवर झोपणार नाही, जंगलात राहील अशी प्रतिज्ञा केली आणि जंगलात निघून गेले तेंव्हापासून "बंजारा लोकांनीही ठरविले की, जोपर्यंत आमचा राजा जंगलात आहे तोपर्यंत आम्हीही जंगलात राहू अशी शपथ घेतली." अशी एक लोककथा बंजारात प्रसिद्ध आहे.

याचाच परिणाम म्हणून की काय? बंजारे आज डोंगर दरीत विसावलेले आहेत. त्याच ठिकाणी त्यांची शेतीही आहे. शहरी संस्कृतीपासून ते दुर गेले. परिणाम त्यांच्या दैनंदिन जीवनावर झाला. परंतू ब्रिटिश कायदद्याने मात्र त्यांना गुन्हेगार जमात म्हणून त्यांच्यावर शिक्काच मारला हा कायदा म्हणजे त्यांच्यासाठी प्रगतीची सर्व दारे बंद करणे आहे म्हणून आजही त्यांच्यात प्रगती पाहीजे तेवढी झालेली नाही आपली प्रगती करून घेण्यासाठी ते ज्या ठिकाणी थांबले त्याच ठिकाणी शेतीचा शोध लावला. शेती करण्यासाठी प्राण्यांचा वापर केला आणि आपले दैनंदिन व्यवहार करण्यासाठी स्वतंत्र बंजारा भाषा निर्माण केली. त्यामुळे त्यांच्यातील देवाण-घेवाण, बोलणे इतर लोकांना कळत नव्हते त्यामुळे ते स्वतःचा विकास स्वतःच करु लागले आहेत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताने स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्याय ही आधुनिक मुल्ये स्विकारली: त्यामुळे भारतातील कोणताही व्यक्ती जात, धर्माच्या नावाखाली शोषण करु शकत नाही ही बाब समानतेच्या निकषासाठी लागू होत असली तरी 'आर्थिक विषमता' मात्र आजही कायम असल्याचे विदारक चित्र पाहावयास मिळते. विशेषतः गावगाड्यातही ज्यांना सामावून घेतल नाही. अशा असंख्य भटक्या जाती आजही डोक्यावर फाटक आभाळ आणि पायाखाली दुभंगलेली जमीन घेऊन भाकरीच्या तुकड्यासाठी गावोगावी फिरताहेत. याचे चित्रण आज पाहिजे त्या प्रमाणात प्रस्थापित सुसंस्कृत साहित्यकाराने केलेले नाहीत. आज या भटक्या-विमुक्त जातीतील धनगर, बंजारा या जाती वगळल्या तर अजूनही दुसऱ्या जाती सर्व सोयी-सुखापासून कोसो दूर आहेत. त्यांना संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात आणणे कठीण दिसते.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी भटक्या-विमुक्तांना बंदिस्त जीवनातून मुक्त केले. तेंव्हापासून त्यांना विमुक्त म्हणू लागले. त्यांच्याच आशीर्वादाने आज काही प्रमाणात त्यांना राहण्याचे, मुक्त जीवन जगण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. तरीही स्वतंत्र भारतात प्रस्थापितांचेच राज्य आहे. त्यांचेच स्वराज्य

Asstt. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar